सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एपीओ-३६२६/प्र.क्र.२५६/पोल-३ दि.१८/०८/२०२६

**विषय:-** राज्यातील पोलीस आयुक्तालय आणि जिल्ह्यामधील नवीन निर्माण करण्यात येणा-या पोलीस ठाण्यांकरिता विचारात घ्यावयाची मार्गदर्शक तत्वे व आवश्यक मनुष्यबळाचे प्रमाणक/निकष ठरविणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक- एपीओ-३६२६/प्र.क्र.२५६/पोल-३, दि.१८/०८/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०८१८१६०१३६५३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Anita Pitambar Rathod
Date: 25-08-2026
17:19:11

( अनिता राठोड )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक सायबर सुरक्षा / महाराष्ट्र राज्य.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), (नियोजन व समन्वय) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

राज्यातील पोलीस आयुक्तालय आणि जिल्ह्यामधील नवीन निर्माण करण्यात येणाऱ्या पोलीस ठाण्यांकरिता विचारात घ्यावयाची मार्गदर्शक तत्वे व आवश्यक मनुष्यबळाचे प्रमाणक/निकष ठरविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एपीओ-३६२६/प्र.क्र.२५६/पोल-३**

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई.
दिनांक : १८ ऑगस्ट, २०२६.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, Government of Bombay, Home Department Resolution No. PRS-५३५९/५७-V Sachivalaya, Bombay-३२ Dated २३rd January, १९६०.

२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : एमआयएस-०२११/प्र.क्र.२३/पोल-३, दिनांक ०४ मे २०११.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क्रमांक : पोमसं/धोरण/४४/नविन पो. ठाणे मनुष्यबळ निकष/०२/२०२२/२११, दिनांक २०/०७/२०२२.

४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क्रमांक : पोमसं/धोरण/४४/नविन पो. ठाणे मनुष्यबळ निकष/०२/२०२२/२९६, दिनांक २४/११/२०२२.

५) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : एपिओ-३६२२/प्र.क्र.१०४(१)/पोल-३, दिनांक २५ ऑगस्ट, २०२३.

६) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : एपिओ-३६२२/प्र.क्र.१०४(२)/पोल-३, दिनांक २५ ऑगस्ट, २०२३.

७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क्रमांक : पोमसं/धोरण/४४/नविन पो. ठाणे मनुष्यबळ निकष/०२/२०२२/२००, दि. १०/१०/२०२५ व दि.०६.११.२०२५.

८) उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक ११.११.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे दि.०२.१२.२०२५ रोजीचे कार्यवृत्त.

**प्रस्तावना :-**

गृह विभागाच्या उपरोक्त क्र. १ येथील दि.२३ जानेवरी, १९६० रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या निकषांनुसार राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये मनुष्यबळ कार्यरत होते. परंतु, १९६० नंतर राज्यात झालेली लोकसंख्या वाढ, महाराष्ट्र राज्यातील वाढते शहरीकरण, वाढत्या शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, औद्योगिक विकास, आय. टी. कंपन्या, तिर्थक्षेत्रे, पर्यटनस्थळे, नागरी वसाहती,

गृहसंकुले, वाहनांची संख्या, राष्ट्रीय महामार्ग, गुन्ह्यांचे बदलते स्वरुप, वाढती गुन्हेगारी, सायबर गुन्हे, इ. मध्ये वारंवार वाढ होत आहे. त्यामुळे १९६० च्या शासन निर्णयामधील निकषांप्रमाणे पोलीस ठाणेसाठी कार्यरत असलेले मनुष्यबळ अपुरे पडत होते. तसेच १९६० च्या नवीन पोलीस ठाणे निर्मितीबाबत निकषांमध्ये बदल करण्याबाबत वित्त विभागाकडून सूचना देण्यात येत होत्या. सदर बाब विचारात घेऊन पोलीस ठाण्यांचे कामकाज सुरळीतपणे पार पडण्याकरिता, राज्यातील पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील आणि जिल्ह्यामधील पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रामधील पोलीस ठाण्यांच्या आवश्यकतेनुसार, पोलीस ठाणेंसाठी मनुष्यबळाचे प्रमाणक/निकष तसेच नवीन पोलीस ठाणे निर्मितीसाठी मार्गदर्शक तत्वे ठरविण्याकरिता संदर्भाधीन क्र.०४ येथील पत्राद्वारे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने, राज्यातील पोलीस आयुक्तालय आणि जिल्ह्यामधील पोलीस ठाण्यांच्या आवश्यकतेनुसार नवीन निर्माण करावयाच्या पोलीस ठाण्याकरिता मनुष्यबळाचे प्रमाणक/निकष तसेच नवीन पोलीस ठाणे निर्मितीसाठी मार्गदर्शक तत्वे ठरण्याबाबत दिनांक २५/०८/२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमीत करण्यात आले आहेत.

उपरोक्त शासन निर्णयाबाबत, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्र.०१/२०२० च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी पोलीस ठाणे निर्मितीच्या व त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ याबाबतीत निर्गमित केलेल्या दि.२५.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयांचा पुर्नविचार करुन, पोलीस ठाणे निर्मिती व त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ याबाबत सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्याबाबत निदेश दिले आहेत.

तसेच, सध्या संपूर्ण जगभरात सायबर गुन्हयांचे प्रमाण वाढत आहे. डिजीटल माध्यमांमुळे नागरिकांची होणारी फसवणूक, सोशल मिडिया, मोबाइल, इंटरनेटच्या माध्यमातून होणारे महिलांविरुद्धचे गुन्हे इ. मुळे सायबर गुन्हयांमध्ये प्रचंड वाढ होत आहे. त्यामुळे राज्यात सायबर पोलीस ठाणेंची निर्मिती करणे, गरजेचे झाले आहे. गडचिरोली व गोंदिया या नक्षलप्रभावित जिल्ह्यातील पोलीस ठाणेतील कामाची पध्दती शहरी आणि ग्रामीण भागातील पोलीस ठाण्याच्या कामाच्या पध्दतीपेक्षा भिन्न आहेत. गडचिरोली व गोंदिया या जिल्ह्यामध्ये नक्षलग्रस्त परिस्थिती व त्या संदर्भातील गुन्ह्यांचे स्वरुप, मोठया प्रमाणात नक्षल अभियान/एल.आर.पी./नाकांबदी/रोड ओपनिंग करीता मनुष्यबळाची कमतरता, नक्षल चळवळीवर अंकुश ठेवून नक्षल कारवाया संपुष्टात आणणे, कायदा व सुव्यवस्था राखणे, स्थानिक ग्रामस्थांमध्ये पोलीस यंत्रणेवरील विश्वास वृध्दींगत करणे, तसेच शासनाच्या विविध योजना व खाजगी क्षेत्राच्या माध्यमातुन गडचिरोली व गोंदिया क्षेत्रातील विकासास हातभार लावणे इ. स्वरुपाचे कामकाज केले जाते. त्यामुळे नक्षलप्रभावित भागाकरिता नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याचे निकष व आवश्यक मनुष्यबळ याकरिता स्वतंत्र निकष करण्याची आवश्यकता आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता, राज्यात नवीन पोलीस ठाणे निर्मितीसाठी आवश्यक मनुष्यबळ प्रमाणक निकष याबाबत सुधारीत धोरणाचा प्रस्ताव सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास कळविले होते. त्यानुसार राज्यात नवीन पोलीस ठाणे निर्मितीसाठी आवश्यक मनुष्यबळ प्रमाणक/निकष व पोलीस ठाणे निर्मितीसाठी मार्गदर्शक तत्वे याबाबतचा सुधारित प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने दि.१०.१०.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे सादर केला आहे. सदरहू प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय वगळून राज्यातील इतर पोलीस आयुक्तालयातील व पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील नवीन निर्माण करण्यात येणाऱ्या पोलीस ठाण्यांचे **"अ-वर्ग"**, **"ब-वर्ग"** आणि **"क वर्ग"** पोलीस ठाणे अशी वर्गवारी खालील निकषांच्या आधारे निश्चित करण्यात येत आहे.

**२. पोलीस ठाणे वर्गवारी**

**"अ" वर्ग पोलीस ठाणेबाबतचे निकष :-**

१. जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण असलेले पोलीस ठाणे.
२. ज्या पोलीस ठाणे हद्दीत संवेदनशील मिश्रवस्ती लोकसंख्या ३५ % पेक्षा अधिक आहे.
३. "अ" वर्ग तिर्थक्षेत्र असलेले पोलीस ठाणे.
४. भा.दं.वि. मधील भाग १ ते ५ गुन्ह्यांची संख्या- ४०० पेक्षा अधिक असेल असे पोलीस ठाणे.
५. ज्या ठिकाणी ५ पेक्षा अधिक शासकीय आस्थापना आहेत व गार्ड नेमावे लागते असे पोलीस ठाणे.
६. मोठे पर्यटनस्थळ जेथे लाखो पर्यटक भेट देतात ते पोलीस ठाणे.
७. २५% पेक्षा अधिक विस्थापित कामगारांची संख्या असलेले पोलीस ठाणे.

पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील **"अ-वर्ग"** पोलीस ठाणेसाठी **परिशिष्ट-२** प्रमाणे व पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील **"अ-वर्ग"** पोलीस ठाणेस **परिशिष्ट-४** प्रमाणे मनुष्यबळ प्रमाणक निश्चित करण्यात येत आहे.

**"ब" वर्ग पोलीस ठाणे बाबतचे निकष :-**

१. तालुका मुख्यालय असलेले पोलीस ठाणे.
२. "ब" वर्ग तिर्थक्षेत्र असलेले ठिकाण.
३. भा.दं.वि. मधील भाग १ ते ५ चे २०० ते ४०० गुन्हे असलेले पोलीस ठाणे.
४. १००० पेक्षा जास्त औद्योगिक कामगारांची संख्या असलेले पोलीस ठाणे.
५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, न्याय दंडाधिकारी यांचे कोर्ट असलेले पोलीस ठाणे.
६. वारंवार मोर्चे, बंदोबस्त असलेले पोलीस ठाणे.
७. मोठे रेल्वे स्टेशन असलेले पोलीस ठाणे.

८. ज्या पोलीस ठाणे हद्दीत संवेदनशील मिश्रवस्ती लोकसंख्या १५% ते ३५% असेल.

९. ज्या पोलीस ठाणे हद्दीमध्ये मोठी यात्रा, मोठी धरणे, खेळाची स्टेडीयम, मोठी पर्यटन स्थळे असून मोठ्या प्रमाणावर जमाव नियंत्रणाचे काम करावयाचे असते असे पोलीस ठाणे.

पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील **"ब-वर्ग "** पोलीस ठाणेसाठी **परिशिष्ट-३** प्रमाणे व पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील **"ब-वर्ग"** पोलीस ठाणेस **परिशिष्ट-५** प्रमाणे मनुष्यबळ प्रमाणक निश्चित करण्यात येत आहे.

**"क" वर्ग पोलीस ठाणेबाबतचे निकष :-**

१. भा.दं.वि. मधील भाग १ ते ५ चे १५० ते २०० गुन्हे असलेले पोलीस ठाणे.

"क वर्ग " क्षेत्रातील पोलीस ठाण्यांसाठी **परिशिष्ट-६** प्रमाणे मनुष्यबळ प्रमाणक निश्चित करण्यात येत आहे.

**उपरोक्त वर्गवारीनुसार नवीन पोलीस ठाणे निर्मिती प्रस्तावित करताना, प्रस्तावित पोलीस ठाण्यामध्ये समाविष्ठ करावयाच्या क्षेत्रामधील मागील तीन वर्षातील भा.दं.वि. मधील भाग १ ते ५ मधील गुन्हे संख्या हा निकष अनिवार्य निकष असेल.** तसेच नमूद करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वामधील किमान ७ ते ८ निकष पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**३. नक्षलग्रस्त भागातील पोलीस ठाणे :-**

गडचिरोली व गोंदिया या नक्षलप्रभावित जिल्ह्यातील पोलीस ठाणेतील कामाची पध्दती शहरी आणि ग्रामीण भागातील पोलीस ठाण्याच्या कामाच्या पध्दतीपेक्षा भिन्न आहेत. त्यामुळे गडचिरोली व गोंदिया जिल्हयातील पोलीस ठाणेचे "अ-वर्ग", "ब-वर्ग" आणि "क-वर्ग" पोलीस ठाणे अशी वर्गवारी करणे, शक्य नाही. त्यामुळे या नक्षलग्रस्त भागामध्ये नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता असल्यास नक्षलप्रभावित जिल्ह्यातील नवीन पोलीस ठाणेंकरिता आवश्यकतेनुसार मनुष्यबळ प्रमाणक तपशील **परिशिष्ट -७** प्रमाणे राहील.

**४. बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय -**

बृहन्मुंबई शहरामधील विशिष्ट भौगोलिक परिस्थिती, अत्यंत दाट लोकसंख्येची घनता, स्थलांतरीतांचे प्रमाण, वाढते गुन्हे व गुन्ह्याचे स्वरुप यानुसार गृह विभाग, शासन पत्र दि.१५/०४/२००५ अन्वये संयुक्त समितीने सध्या अस्तित्त्वात असलेल्या मुंबई शहरातील सर्व पोलीस ठाणे "अ" वर्गात मोडत असल्याचे नमुद केले आहे.

बृहन्मुंबई आयुक्तालयातील नवीन निर्माण करण्यात येणाऱ्या पोलीस ठाण्याच्या आवश्यकतेनुसार ३६२ च्या मर्यादेत मनुष्यबळाच्या प्रमाणकाचा तपशील **"परिशिष्ट-१"** प्रमाणे राहील.

५. बदलत्या परिस्थितीनुसार विविध पोलीस घटकांचे अभिप्राय विचारात घेऊन राज्यातील पोलीस आयुक्तालयातील आणि जिल्ह्यामधील पोलीस ठाण्यांच्या आवश्यकतेनुसार पोलीस

ठाण्यांसाठी (बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय वगळून) मनुष्यबळाचे सुधारित प्रमाणक/निकष तयार करण्यात आले आहे. त्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत BPR&D यांच्या अहवालातील शहरी व ग्रामीण पोलीस ठाण्यांसाठी असलेल्या मनुष्यबळाच्या मापदंडाचा अभ्यास करण्यात आला आहे.

६. नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या पोलीस ठाण्याकरिता या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टांमध्ये नमूद केल्यानुसार मनुष्यबळ निश्चित करण्यात आले असले तरी, सध्या राज्यात पोलीस दलांकडून सायबर सुरक्षा प्रकल्प, डायल-११२, C.C.T.N.S, MARVEL, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांचे संगणकीकरण, Centre Of Excellence इत्यादी. विविध तंत्रज्ञान विषयक प्रकल्प राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये सध्या गुन्हेगारीचे स्वरुप दिवसेंदिवस बदलत असून तांत्रिक कौशल्याचा वापर करुन सायबर गुन्हे, आर्थिक फसवणुकीचे गुन्हे वाढत असून त्याकरिता पोलीस विभागाकडून विविध तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांची अंमलबजावणी सुरू आहे. त्यामुळे नव्याने निर्माण करावयाच्या पोलीस ठाण्यांसाठी विहीत केलेल्या मर्यादेत केवळ आवश्यक इतक्याच नवीन मनुष्यबळाची मागणी करण्यात यावी.

७. वर नमूद केल्याप्रमाणे पोलीस ठाण्यांची वर्गवारी निश्चित करण्याच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक यांच्या अधिनस्त एक समिती स्थापन करण्यात यावी. घटक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या नवीन पोलीस ठाणे निर्मितीच्या प्रस्तावांचे सखोल परिक्षण करुन नवीन पोलीस ठाण्याची आवश्यकता आहे किंवा कसे, याबाबतचा निर्णय या समितीमार्फत घेण्यात यावा. तसेच, प्रस्तावित पोलीस ठाणेची वर्गवारी निश्चित करून आवश्यकतेनुसार विहित केलेल्या मनुष्यबळाच्या मर्यादेनुसार प्रस्ताव सादर करण्यात यावा.

८. नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याचे प्रस्ताव वरीलप्रमाणे निश्चित केलेले निकष व वर्गवारी पुर्ण करत असतील, तरच शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावेत.

९. उपरोक्त पोलीस ठाणे वर्गवारी व नवीन मनुष्यबळ निकष हे यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकानंतर नव्याने स्थापन होणाऱ्या पोलीस ठाणेकरिता लागू असतील. पोलीस ठाण्यांच्या वर्गवारीनुसार मनुष्यबळ विहीत करण्यात आले असले तरी, सदर मनुष्यबळामध्ये कपात करण्याचे अथवा बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१०. अस्तित्वातील पोलीस ठाण्यासाठी वाढीव मनुष्यबळाची मागणी करण्यात आल्यास, त्या पोलीस ठाण्यास मंजूर असलेली पदे, पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील गुन्ह्यांचे प्रमाण व इतर निकष यांचा साकल्याने विचार करुन नवीन मनुष्यबळ निर्माण करण्याबाबतचा निर्णय पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या स्तरावरील समितीमार्फत घेण्यात यावा व तद्नंतर त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

११. राज्यात पोलीस ठाणे निर्मितीबाबत मार्गदर्शक तत्वे व मनुष्यबळ निर्मितीचे प्रमाणक/निकष याबाबतचे यापुर्वीचे सर्व शासन निर्णय, परिपत्रके, इ. अधिक्रमित करण्यात येत आहेत.

१२. दि.११.१२.२०२५ रोजीच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीमध्ये दिलेल्या सुचनेस अनुसरुन, सायबर पोलीस ठाणेस आवश्यक मनुष्यबळ प्रमाणक/निकष निश्चित करताना, आय.टी. क्षेत्राशी निगडीत तांत्रिक ज्ञान व अर्हता प्राप्त मनुष्यबळाचा योग्य प्रमाणात समावेश करुन, सायबर पोलीस ठाण्याचे मनुष्यबळ प्रमाणक/निकष वित्त विभागाच्या मान्यतेने स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

१३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ सं.क्र. १५३/२०२६, दि.१०.०६.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१८१६०१३६५३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by AJIT MALHARI KAWADE
Date: 2026.08.18 16:03:00 +05'30'

**(अजित म. कवडे)**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (सेवा), साप्रवि, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) सर्व पोलीस आयुक्त/सर्व पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र.
८) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र.
९) सर्व विभागीय आयुक्त (महसूल), महाराष्ट्र.
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
१२) उपसचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
१३) वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
१४) निवड नस्ती, पोल-३.

# परिशिष्ट -१

## बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यालयातील पोलीस ठाण्याच्या आवश्यकतेनुसार मनुष्यबळाच्या प्रमाणक / निकषांचा तपशिल

| अ.क्र. | कर्तव्य | PI | API | PSI | ASI | HC | PC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी +४ पोलीस निरीक्षक | ५ | ० | ० | ० | ० | ० | ५ |
| २ | ठाणे अमंलदार व मदतनीस (दिवस/रात्रौ) | ० | ० | ४ | ० | २ | ६ | १२ |
| ३ | संगणक कक्ष/CCTNS (दिवस/रात्रौ) | ० | -- | -- | -- | २ | ४ | ६ |
| ४ | पोलीस ठाणे अभिलेख | ० | -- | -- | -- | | १ | १ |
| ५ | मुद्देमाल कारकुन | -- | -- | -- | १ | १ | ० | २ |
| ६ | लेखनिक/रायटर | ० | -- | -- | -- | ४ | २ | ६ |
| ७ | हजेरी कारकुन/डयुटी बटवडा | -- | -- | -- | -- | १ | ३ | ४ |
| ८ | क्राईम रायटर/गुन्हे अभिलेख | | | | | १ | ४ | ५ |
| ९ | डे बुक | -- | -- | -- | १ | १ | २ | ४ |
| १० | पारपत्र | | | | | १ | ३ | ४ |
| ११ | प्रतिबंधक कारवाई/सर्वेलन्स | ० | १ | १ | ३ | २ | १२ | १९ |
| १२ | पोलीस ठाणे गार्ड (दिवस/रात्रौ) | ० | ० | ० | ० | ३ | ६ | ९ |
| १३ | लॉकअप गार्ड (दिवस/रात्रौ) | ० | ० | ० | ० | ३ | ६ | ९ |
| १४ | व्हीआयपी सुरक्षा/आरोपी पार्टी | ० | ० | २ | ० | ४ | १२ | १८ |
| १५ | दहशदवाद विरीधी पथेक | ० | ० | २ | १ | २ | ६ | ११ |
| १६ | हरवलेल्या महिला व मुले शोधपथक | ० | ० | २ | १ | २ | ४ | ९ |
| १७ | सेवा/समाधान/स्वागतकक्ष | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| १८ | महिला मदत केंद्र (Women Help Desk)/निर्भया पथक (दिवस/रात्रौ) | ० | ० | १ | १ | १ | ४ | ७ |
| १९ | न्यायालय व पैरवी | ० | ० | २ | ० | १ | १ | ४ |
| २० | न्यायालय सुरक्षा (प्रत्येक कोर्टासाठी १ PC) | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| २१ | एल.आय.बी./गोपनिय | ० | ० | २ | ० | १ | २ | ५ |
| २२ | बिनतारी संदेश यंत्रणा (दिवस/रात्रौ) | ० | ० | ० | ० | ० | ४ | ४ |
| २३ | टपाल वाहक | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| २४ | बारनिशी व माहिती अधिकारासाठी | ० | ० | ० | ० | २ | ६ | ८ |
| २५ | ५० Ipc (UAPA/IPC/SLL)गुन्हयाकरिता (भाग १ ते ५ गुन्हयाकरिता १ तपास पथक पुढील प्रत्येक ५० गुन्हयाकरीता १ PSI, १ASI/HC व १ PC ची वाढ) | ० | १ | २ | १ | ३ | १० | १७ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | १५० विशेष्र /स्थानिक कायद्यांर्गत गुन्हे (भाग६) व आकस्मित मृत्यू यांकरीता १ तपास पथक पुढील प्रत्येक ५० गुन्हयांकरीता १ पोह व १ पोशि ची वाढ पुढील प्रत्येकी १५० गुन्हयांकरीता १ पोउनि/सपोनि ची वाढ | ० | १ | २ | १ | २ | १० | १६ |
| २७ | ५०००० लोकसंख्येमागे १ पोलीस चौकीकरिता (उपलब्धतेनुसार सपोनि/पोउनि)पुढील २५००० लोकसंख्येकरीता २ पोशि | ० | १ | १ | १ | २ | ९ | १४ |
| २८ | १००० समन्स करीता पुढील प्रत्येक १००० समन्स करीता १ पोशि | ० | ० | ० | ० | ४ | ४ | ८ |
| २९ | २५० वॉरंट करीता पुढील प्रत्येक २५० वॉरंटकरीता करीता १ पोशि | ० | ० | ० | ० | ४ | ४ | ८ |
| ३० | २५० अर्ज चौकशीकरीता करीता पुढील प्रत्येक २५० अर्ज चौकशी करीता करीता १ पोह | ० | ० | ० | ० | ४ | ४ | ८ |
| ३१ | गुन्हे प्रकटीकरण्र /डी.बी.(दिवस/रात्रौ) | ० | २ | ० | १ | ४ | ९ | १६ |
| ३२ | मोबाईल/मोटार वाहन चोरी शोध पथेक | ० | ० | ० | १ | ४ | ९ | १४ |
| ३३ | प्रत्येक चारचाकी वाहनाकरिता वाहन चालक (दिवस/रात्रौ) | ० | ० | ० | १ | ० | ५ | ६ |
| ३४ | प्रत्येक दुचाकी वाहनाकरिता चालक (दिवस/रात्रौ) | ० | ० | ० | १ | ० | ५ | ६ |
| ३५ | प्रत्येक डायल ११२ चारचाकी वाहन - अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | ० | ० | ० | ० | ४ | ८ | १२ |
| ३६ | प्रत्येक डायल ११२ दुचाकी वाहन - अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | ० | ० | ० | ० | ४ | ८ | १२ |
| ३७ | प्रत्येक १ फिक्स पाईट करिता (दिवस/रात्रौ) | ० | ० | ० | ० | २ | ४ | ६ |
| ३८ | धार्मिक/पर्यटन/वादग्रस्त/मर्मस्थळे (दिवस/रात्रौ) (आवश्यकतेनुसार) | ० | ० | ० | २ | २ | ४ | ८ |
| ३९ | सायबर पथक | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| ४० | रेल्वे स्थानक कर्तव्य (रेल्वे स्थानक आहे परंतु जी.आर.पी. पोलीस ठाणे नाही अशा ठिकाणी फक्त) | ० | ० | ० | १ | १ | १ | ३ |
| ४१ | RTPC | ० | ० | ० | ० | २ | ६ | ८ |
| ४२ | CCTV निगराणी | ० | ० | ० | ० | २ | २ | ४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४३ | सफाई कर्मचारी (कंत्राटी पध्दतीने) | | | | | | | ४ |
| | **एकूण** | **५** | **६** | **२१** | **१८** | **७९** | **१९७** | **३३०** |
| ४३ | रजा/प्रशिक्षण/आजारपण एकुण मनुष्य बळाच्या १०% राखीव राखीव अमंलदार | ० | ० | २ | २ | ८ | २० | ३२ |
| | **एकूण आवश्यक मनुष्यबळ** | **५** | **६** | **२३** | **२०** | **८७** | **२१७** | **३६२** |

# परिशिष्ट २

## राज्यातील पोलीस आयुक्तालयातील "अ वर्ग" पोलीस ठाणेकरिता मनुष्यबळ प्रमाणक

| अ.क्र. | कर्तव्य | PI | API | PSI | ASI | HC | PC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे प्रभारी +२ पोलीस निरीक्षक | ३ | | | | | | ३ |
| २ | ठाणे अंमलदार व मदतनीस (दिवस/रात्रौ) | | | २ | | २ | ६ | १० |
| ३ | संगणक कक्ष/ CCTNS (दिवस/रात्रौ) | | | | | २ | ४ | ६ |
| ४ | पोलीस ठाणे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ५ | मुद्येमाल कारकुन | | | | | १ | १ | २ |
| ६ | लेखनिक / रायटर | | | | | २ | १ | ३ |
| ७ | हजेरी कारकुन /डयुटी बटवडा | | | | | १ | १ | २ |
| ८ | क्राईम रायटर /गुन्हे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ९ | डे बुक | | | | १ | | | १ |
| १० | पारपत्र | | | | | १ | २ | ३ |
| ११ | प्रतिबंधक कारवाई / सर्व्हेलन्स | | १ | १ | १ | १ | २ | ६ |
| १२ | पोलीस ठाणे गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| १३ | लॉकअप गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | २ | ६ | ८ |
| १४ | VIP सुरक्षा / आरोपी पार्टी | | | | १ | १ | ३ | ५ |
| १५ | दहशतवाद विरोधी पथक (एटीसी) | | | १ | १ | | ३ | ५ |
| १६ | हरवलेल्या महीला व मुले शोध पथक | | | | १ | १ | १ | ३ |
| १७ | सेवा/समाधान/स्वागतकक्ष | | | | | | १ | १ |
| १८ | महिला मदत केंद्र (Woman Help Desk)/निर्भया पथक (दिवस/रात्रौ) | | | २ | | २ | २ | ६ |
| १९ | न्यायालय व पैरवी | | | १ | | १ | १ | ३ |
| २० | न्यायालय सुरक्षा (प्रत्येक कोर्टासाठी १ PC) | | | | | | १ | १ |
| २१ | एल. आय. बी. / गोपनिय | | | | १ | १ | १ | ३ |
| २२ | बिनतारी संदेश यंत्रणा (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| २३ | टपाल वाहक | | | | | | १ | १ |
| २४ | बारनिशी व माहिती अधिकारासाठी | | | | | १ | १ | २ |
| २५ | ५० IPC (भाग १ ते ५) गुन्हयांकरीता १ तपास पथक<br>पुढील प्रत्येक ५० गुन्हयाकरिता १ PSI, १ ASI/HC व १ PC ची वाढ | | १ | २ | १ | १ | २ | ७ |
| २६ | १५० विशेष/स्थानिक कायद्यांर्गत गुन्हे (भाग ६) व आकस्मित मृत्यू यांकरीता १ तपास पथक<br>पुढील प्रत्येकी ५० गुन्हयाकरिता १ HC व १ PC ची वाढ | | १ | १ | १ | २ | २ | ७ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुढील प्रत्येकी १५० गुन्हयाकरिता १ PSI/API ची वाढ | | | | | | | |
| २७ | ५०,००० लोकसंख्येमागे १ पोलीस चौकीकरिता (उपलब्धेनुसार API/PSI) पुढील २५००० लोकसंख्येकरीता २ PC | | १ | १ | २ | २ | ४ | १० |
| २८ | १,००० समन्स करीता<br>पुढील प्रत्येक १००० समन्स करीता १ PC | | | | | | १ | १ |
| २९ | २५० वॉरंट करीता<br>पुढील प्रत्येक २५० वॉरंट करीता १ PC | | | | | | २ | २ |
| ३० | २५० अर्ज चौकशी करीता<br>पुढील प्रत्येक २५० अर्ज चौकशीकरीता १ HC | | | | | १ | | १ |
| ३१ | गुन्हे प्रकटीकरण / डी. बी. (दिवस/रात्रौ) | | २ | | २ | २ | २ | ८ |
| ३२ | प्रत्येक चारचाकी वाहनाकरिता वाहन चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३३ | प्रत्येक दुचाकी वाहनाकरिता चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३४ | प्रत्येक डायल ११२ चारचाकी वाहन - अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | | | | | २ | ४ | ६ |
| ३५ | प्रत्येक डायल ११२ दुचाकी वाहन - अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| ३६ | प्रत्येक १ फिक्स पाईट करिता (दिवस/रात्रौ) | | | | | १ | २ | ३ |
| ३७ | धार्मिक/पर्यटन/वादग्रस्त/मर्मस्थळे (दिवस/रात्रौ) (आवश्यकतेनुसार) | | | २ | | २ | ४ | ८ |
| ३८ | सायबर पथक | १ | | | | १ | १ | ३ |
| ३९ | रेल्वे स्थानक कर्तव्य (रेल्वे स्थानक आहे परंतु जी.आर.पी. पोलीस ठाणे नाही अश्या ठिकाणी फक्त) | | | | | १ | १ | २ |
| ४० | RTPC | | | | | | १ | १ |
| ४१ | CCTV निगराणी | | | | | | २ | २ |
| ४२ | सफाई कर्मचारी (कंत्राटी पदधतीने) | | | | | | | २ |
| | **एकुण** | **४** | **६** | **१३** | **१२** | **४०** | **७६** | **१५३** |
| ४३ | रजा/प्रशिक्षण/आजारपण एकुण मनुष्य बळाच्या १०% राखीव अमंलदार | ० | ० | ० | १ | ४ | ८ | १३ |
| | **एकुण आवश्यक मुनष्यबळ** | **४** | **६** | **१३** | **१३** | **४४** | **८४** | **१६६** |

## परिशिष्ट ३

## राज्यातील पोलीस आयुक्तालयातील "ब वर्ग" पोलीस ठाणेकरिता मनुष्यबळ प्रमाणक

| अ.क्र. | कर्तव्य | PI | API | PSI | ASI | HC | PC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे प्रभारी +२ पोलीस निरीक्षक | ३ | | | | | | ३ |
| २ | ठाणे अंमलदार व मदतनीस (दिवस/रात्रौ) | | | २ | | २ | ६ | १० |
| ३ | संगणक कक्ष/ CCTNS (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| ४ | पोलीस ठाणे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ५ | मुद्येमाल कारकुन | | | | | १ | १ | २ |
| ६ | लेखनिक / रायटर | | | | | २ | १ | ३ |
| ७ | हजेरी कारकुन /डयुटी बटवडा | | | | | १ | १ | २ |
| ८ | क्राईम रायटर /गुन्हे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ९ | डे बुक | | | | १ | | | १ |
| १० | पारपत्र | | | | | १ | १ | २ |
| ११ | प्रतिबंधक कारवाई / सर्व्हेलन्स | | | १ | १ | १ | १ | ४ |
| १२ | पोलीस ठाणे गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| १३ | लॉकअप गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | २ | ६ | ८ |
| १४ | VIP सुरक्षा / आरोपी पार्टी | | | | १ | १ | ३ | ५ |
| १५ | दहशतवाद विरोधी पथक (एटीसी) | | | १ | | १ | २ | ४ |
| १६ | हरवलेल्या महीला व मुले शोध पथक | | | | | १ | १ | २ |
| १७ | सेवा/समाधान/स्वागतकक्ष | | | | | १ | | १ |
| १८ | महिला मदत केंद्र (Woman Help Desk)/ निर्भया पथक (दिवस/रात्रौ) | | | १ | १ | १ | २ | ५ |
| १९ | न्यायालय व पैरवी | | | १ | | १ | १ | ३ |
| २० | न्यायालय सुरक्षा (प्रत्येक कोर्टासाठी १ PC) | | | | | | १ | १ |
| २१ | एल. आय. बी. / गोपनिय | | | | | १ | १ | २ |
| २२ | बिनतारी संदेश यंत्रणा (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| २३ | टपाल वाहक | | | | | | १ | १ |
| २४ | बारनिशी व माहिती अधिकारासाठी | | | | | १ | १ | २ |
| २५ | ५० IPC (भाग १ ते ५) गुन्हयांकरीता १ तपास पथक पुढील प्रत्येक ५० गुन्हयाकरिता १ PSI, १ ASI/ HC व १ PC ची वाढ | | १ | २ | १ | १ | २ | ७ |
| २६ | १५० विशेष/स्थानिक कायद्यांर्गत गुन्हे (भाग ६) व आकस्मित मृत्यू यांकरीता १ तपास पथक पुढील प्रत्येकी ५० गुन्हयाकरिता १ HC व १ PC ची वाढ पुढील प्रत्येकी १५० गुन्हयाकरिता १ PSI/API ची वाढ | | १ | १ | १ | २ | २ | ७ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | ५०,००० लोकसंख्येमागे १ पोलीस चौकीकरिता (उपलब्धेनुसार API/PSI) पुढील २५००० लोकसंख्येकरीता २ PC) | | १ | १ | १ | १ | २ | ६ |
| २८ | १,००० समन्स करीता<br>पुढील प्रत्येक १००० समन्स करीता १ PC | | | | | | १ | १ |
| २९ | २५० वॉरंट करीता<br>पुढील प्रत्येक २५० वॉरंट करीता १ PC | | | | | | २ | २ |
| ३० | २५० अर्ज चौकशी करीता<br>पुढील प्रत्येक २५० अर्ज चौकशीकरीता १ HC | | | | | १ | | १ |
| ३१ | गुन्हे प्रकटीकरण / डी. बी. (दिवस/रात्रौ) | | | २ | २ | २ | २ | ८ |
| ३२ | प्रत्येक चारचाकी वाहनाकरिता वाहन चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३३ | प्रत्येक दुचाकी वाहनाकरिता चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३४ | प्रत्येक डायल ११२ चारचाकी वाहन - अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | | | | | २ | ४ | ६ |
| ३५ | प्रत्येक डायल ११२ दुचाकी वाहन - अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| ३६ | प्रत्येक १ फिक्स पाईट करिता (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३७ | धार्मिक/पर्यटन/वादग्रस्त/मर्मस्थळे (दिवस/रात्रौ) (आवश्यकतेनुसार) | | | | २ | २ | २ | ६ |
| ३८ | सायबर पथक | | | १ | | १ | १ | ३ |
| ३९ | रेल्वे स्थानक कर्तव्य (रेल्वे स्थानक आहे परंतु जी.आर.पी. पोलीस ठाणे नाही अश्या ठिकाणी फक्त) | | | | | १ | १ | २ |
| ४० | RTPC | | | | | | १ | १ |
| ४१ | CCTV निगराणी | | | | | | २ | २ |
| ४२ | सफाई कर्मचारी (कंत्राटी पदधतीने) | | | | | | | २ |
| | **एकुण** | **३** | **३** | **१३** | **११** | **४०** | **६५** | **१३७** |
| ४३ | रजा/प्रशिक्षण/आजारपण एकुण मनुष्य बळाच्या १०% राखीव अमंलदार | ० | ० | ० | १ | ४ | ७ | १२ |
| | **एकुण आवश्यक मुनष्यबळ** | **३** | **३** | **१३** | **१२** | **४४** | **७२** | **१४९** |

## परिशिष्ट ४

## राज्यातील पोलीस अधीक्षक क्षेत्रातील "अ वर्ग" पोलीस ठाणेकरिता मनुष्यबळ प्रमाणक

| अ.क्र. | कर्तव्य | PI | API | PSI | ASI | HC | PC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे प्रभारी (PI/API आवश्यकतेनुसार) | १ | १ | | | | | २ |
| २ | ठाणे अंमलदार व मदतनीस (दिवस/रात्रौ) | | | | १ | १ | ४ | ६ |
| ३ | संगणक कक्ष/ CCTNS (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| ४ | पोलीस ठाणे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ५ | मुद्येमाल कारकुन | | | | | १ | १ | २ |
| ६ | लेखनिक/रायटर (प्रत्येक PI - १ HC, API-१ PC) | | | | | १ | १ | २ |
| ७ | हजेरी कारकुन /डयुटी बटवडा | | | | | १ | १ | २ |
| ८ | क्राईम रायटर /गुन्हे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ९ | डे बुक | | | | १ | | | १ |
| १० | पारपत्र | | | | | १ | १ | २ |
| ११ | प्रतिबंधक कारवाई / सर्व्हेलन्स | | | १ | १ | १ | १ | ४ |
| १२ | पोलीस ठाणे गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| १३ | लॉकअप गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | २ | ६ | ८ |
| १४ | VIP सुरक्षा / आरोपी पार्टी | | | | १ | १ | ३ | ५ |
| १५ | दहशतवाद विरोधी पथक (एटीसी) | | | | १ | १ | २ | ४ |
| १६ | हरवलेल्या महीला व मुले शोध पथक | | | | | १ | १ | २ |
| १७ | सेवा/समाधान/स्वागतकक्ष | | | | | १ | | १ |
| १८ | महिला मदत केंद्र (Woman Help Desk)/निर्भया पथक (दिवस/रात्रौ) | | | १ | १ | १ | २ | ५ |
| १९ | न्यायालय व पैरवी | | | | | १ | २ | ३ |
| २० | न्यायालय सुरक्षा (प्रत्येक कोर्टासाठी १ PC) | | | | | | १ | १ |
| २१ | एल. आय. बी. / गोपनिय | | | | | १ | १ | २ |
| २२ | बिनतारी संदेश यंत्रणा (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| २३ | टपाल वाहक | | | | | | १ | १ |
| २४ | बारनिशी व माहिती अधिकारासाठी | | | | १ | | १ | २ |
| २५ | ५० IPC (भाग १ ते ५) गुन्हयांकरीता १ तपास पथक पुढील प्रत्येक ५० गुन्हयाकरिता १ PSI, १ ASI/HC व १ PC ची वाढ | | १ | २ | १ | १ | २ | ७ |
| २६ | १५० विशेष/स्थानिक कायद्यांर्गत गुन्हे (भाग ६) व आकस्मित मृत्यू यांकरीता १ तपास पथक पुढील प्रत्येकी ५० गुन्हयाकरिता १ HC व १ PC ची वाढ पुढील प्रत्येकी १५० गुन्हयाकरिता १ PSI/API ची वाढ | | १ | १ | १ | २ | २ | ७ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | ५०,००० लोकसंख्येमागे १ पोलीस चौकीकरिता<br>पुढील २५००० लोकसंख्येकरीता २ PC | | | | | १ | ३ | ४ |
| २८ | १,००० समन्स करीता<br>पुढील प्रत्येक १००० समन्स करीता १ PC | | | | | | १ | १ |
| २९ | २५० वॉरंट करीता<br>पुढील प्रत्येक २५० वॉरंट करीता १ PC | | | | | | २ | २ |
| ३० | २५० अर्ज चौकशी करीता<br>पुढील प्रत्येक २५० अर्ज चौकशीकरीता १ HC | | | | | १ | | १ |
| ३१ | गुन्हे प्रकटीकरण / डी. बी. (दिवस/रात्रौ) | | | २ | २ | २ | २ | ८ |
| ३२ | प्रत्येक चारचाकी वाहनाकरिता वाहन चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३३ | प्रत्येक दुचाकी वाहनाकरिता चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३४ | प्रत्येक डायल ११२ चारचाकी वाहन - अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | | | | | २ | ४ | ६ |
| ३५ | प्रत्येक डायल ११२ दुचाकी वाहन - अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| ३६ | प्रत्येक १ फिक्स पाईट करिता (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३७ | धार्मिक/पर्यटन/वादग्रस्त/मर्मस्थळे (दिवस/रात्रौ) (आवश्यकतेनुसार) | | | | २ | २ | २ | ६ |
| ३८ | प्रत्येक तालुका पोलीस ठाणे सायबर कक्ष | | | १ | | १ | १ | ३ |
| ३९ | वाहतुक पथक | | | १ | १ | १ | २ | ५ |
| ४० | रेल्वे स्थानक कर्तव्य (रेल्वे स्थानक आहे परंतु जी.आर.पी. पोलीस ठाणे नाही अश्या ठिकाणी फक्त) | | | | | १ | १ | २ |
| ४१ | RTPC | | | | | | १ | १ |
| ४२ | CCTV निगराणी | | | | | | २ | २ |
| ४३ | सफाई कर्मचारी (कंत्राटी पदधतीने) | | | | | | | २ |
| | **एकुण** | **१** | **३** | **९** | **१४** | **३८** | **६७** | **१३४** |
| ४४ | रजा/प्रशिक्षण/आजारपण एकुण मनुष्य बळाच्या १०% राखीव अमंलदार | ० | ० | ० | १ | ४ | ७ | १२ |
| | **एकुण आवश्यक मुनष्यबळ** | **१** | **३** | **९** | **१५** | **४२** | **७४** | **१४६** |

## परिशिष्ट ५

## राज्यातील पोलीस अधीक्षक क्षेत्रातील "ब वर्ग" पोलीस ठाणेकरिता मनुष्यबळ प्रमाणक

| अ.क्र. | कर्तव्य | PI | API | PSI | ASI | HC | PC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे प्रभारी (PI/API आवश्यकतेनुसार) | १ | १ | | | | | २ |
| २ | ठाणे अंमलदार व मदतनीस (दिवस/रात्रौ) | | | | १ | १ | ४ | ६ |
| ३ | संगणक कक्ष/ CCTNS (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ४ | पोलीस ठाणे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ५ | मुद्येमाल कारकुन | | | | | | १ | १ |
| ६ | लेखनिक/रायटर (प्रत्येक PI - १ HC, API-१ PC) | | | | | १ | १ | २ |
| ७ | हजेरी कारकुन /डयुटी बटवडा | | | | | १ | १ | २ |
| ८ | क्राईम रायटर /गुन्हे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ९ | डे बुक | | | | | १ | | १ |
| १० | पारपत्र | | | | | १ | १ | २ |
| ११ | प्रतिबंधक कारवाई / सर्व्हेलन्स | | | १ | १ | | २ | ४ |
| १२ | पोलीस ठाणे गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| १३ | लॉकअप गार्ड (दिवस/रात्रौ ) | | | | | २ | ६ | ८ |
| १४ | VIP सुरक्षा / आरोपी पार्टी | | | | १ | १ | २ | ४ |
| १५ | दहशतवाद विरोधी पथक (एटीसी) | | | | १ | १ | १ | ३ |
| १६ | हरवलेल्या महीला व मुले शोध पथक | | | | | १ | १ | २ |
| १७ | सेवा/समाधान/स्वागतकक्ष | | | | | १ | | १ |
| १८ | महिला मदत केंद्र (Woman Help Desk)/ निर्भया पथक (दिवस/रात्रौ) | | | १ | १ | | २ | ४ |
| १९ | न्यायालय व पैरवी | | | | | १ | १ | २ |
| २० | न्यायालय सुरक्षा (प्रत्येक कोर्टासाठी १ PC) | | | | | | १ | १ |
| २१ | एल. आय. बी. / गोपनिय | | | | | १ | | १ |
| २२ | बिनतारी संदेश यंत्रणा (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| २३ | टपाल वाहक | | | | | | १ | १ |
| २४ | बारनिशी व माहिती अधिकारासाठी | | | | | १ | १ | २ |
| २५ | ५० IPC (भाग १ ते ५) गुन्हयांकरीता १ तपास पथक पुढील प्रत्येक ५० गुन्हयाकरिता १ PSI, १ ASI/ HC व १ PC ची वाढ | | १ | २ | १ | १ | २ | ७ |
| २६ | १५० विशेष/स्थानिक कायद्यांर्गत गुन्हे (भाग ६) व आकस्मित मृत्यू यांकरीता १ तपास पथक पुढील प्रत्येकी ५० गुन्हयाकरिता १ HC व १ PC ची वाढ पुढील प्रत्येकी १५० गुन्हयाकरिता १ PSI/API ची वाढ | | १ | १ | १ | २ | २ | ७ |
| २७ | ५०,००० लोकसंख्येमागे १ पोलीस चौकीकरिता पुढील २५००० लोकसंख्येकरीता २ PC) | | | | | १ | ३ | ४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | १,००० समन्स करीता<br>पुढील प्रत्येक १००० समन्स करीता १ PC | | | | | | १ | १ |
| २९ | २५० वॉरंट करीता<br>पुढील प्रत्येक २५० वॉरंट करीता १ PC | | | | | | २ | २ |
| ३० | २५० अर्ज चौकशी करीता पुढील प्रत्येक २५० अर्ज चौकशीकरीता १ HC | | | | | १ | | १ |
| ३१ | गुन्हे प्रकटीकरण / डी. बी. (दिवस/रात्रौ) | | | २ | २ | २ | २ | ८ |
| ३२ | प्रत्येक चारचाकी वाहनाकरिता वाहन चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३३ | प्रत्येक दुचाकी वाहनाकरिता चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३४ | प्रत्येक डायल ११२ चारचाकी वाहन -<br>अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | | | | | २ | ४ | ६ |
| ३५ | प्रत्येक डायल ११२ दुचाकी वाहन -<br>अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| ३६ | प्रत्येक १ फिक्स पाईट करिता (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३७ | धार्मिक/पर्यटन/वादग्रस्त/मर्मस्थळे (दिवस/रात्रौ) (आवश्यकतेनुसार) | | | | | २ | २ | ४ |
| ३८ | प्रत्येक  तालुका पोलीस ठाणे  सायबर कक्ष | | | १ | | १ | १ | ३ |
| ३९ | वाहतुक  पथक | | | | १ | १ | २ | ४ |
| ४० | रेल्वे स्थानक कर्तव्य  (रेल्वे स्थानक आहे परंतु, जी.आर.पी. पोलीस ठाणे नाही अश्या ठिकाणी फक्त) | | | | | १ | १ | २ |
| ४१ | RTPC | | | | | | १ | १ |
| ४२ | CCTV   निगराणी | | | | | | २ | २ |
| ४३ | सफाई कर्मचारी (कंत्राटी पदधतीने) | | | | | | | २ |
| | **एकुण** | **१** | **३** | **८** | **१०** | **३६** | **६३** | **१२३** |
| ४४ | रजा/प्रशिक्षण/आजारपण एकुण मनुष्य बळाच्या  १०% राखीव अमंलदार | ० | ० | ० | १ | ४ | ६ | ११ |
| | **एकुण आवश्यक मुनष्यबळ** | **१** | **३** | **८** | **११** | **४०** | **६९** | **१३४** |

## परिशिष्ट ६

## राज्यातील पोलीस अधीक्षक क्षेत्रातील "क वर्ग" पोलीस ठाणेकरिता मनुष्यबळ प्रमाणक

| अ.क्र. | कर्तव्य | PI | API | PSI | ASI | HC | PC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे प्रभारी (PI/API आवश्यकतेनुसार) | १ | १ | | | | | २ |
| २ | ठाणे अंमलदार व मदतनीस (दिवस/रात्रौ) | | | | १ | १ | २ | ४ |
| ३ | संगणक कक्ष/ CCTNS (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ४ | पोलीस ठाणे अभिलेख | | | | | | १ | १ |
| ५ | मुद्येमाल कारकुन | | | | | | १ | १ |
| ६ | लेखनिक/रायटर (प्रत्येक PI - १ HC, API-१ PC) | | | | | १ | १ | २ |
| ७ | हजेरी कारकुन /डयुटी बटवडा | | | | | | २ | २ |
| ८ | क्राईम रायटर /गुन्हे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ९ | डे बुक | | | | | १ | | १ |
| १० | पारपत्र | | | | | | १ | १ |
| ११ | प्रतिबंधक कारवाई / सर्व्हेलन्स | | | | | १ | २ | ३ |
| १२ | पोलीस ठाणे गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| १३ | लॉकअप गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | २ | ४ | ६ |
| १४ | VIP सुरक्षा / आरोपी पार्टी | | | | | १ | २ | ३ |
| १५ | दहशतवाद विरोधी पथक (एटीसी) | | | | | १ | १ | २ |
| १६ | हरवलेल्या महीला व मुले शोध पथक | | | | | १ | १ | २ |
| १७ | सेवा/समाधान/स्वागतकक्ष | | | | | | १ | १ |
| १८ | महिला मदत केंद्र (Woman Help Desk)/निर्भया पथक (दिवस/रात्रौ) | | | १ | | १ | १ | ३ |
| १९ | न्यायालय व पैरवी | | | | | १ | १ | २ |
| २० | न्यायालय सुरक्षा (प्रत्येक कोर्टासाठी १ PC) | | | | | | १ | १ |
| २१ | एल. आय. बी. / गोपनिय | | | | | | १ | १ |
| २२ | बिनतारी संदेश यंत्रणा (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| २३ | टपाल वाहक | | | | | | १ | १ |
| २४ | बारनिशी व माहिती अधिकारासाठी | | | | | | १ | १ |
| २५ | ५० IPC (भाग १ ते ५) गुन्हयांकरीता १ तपास पथक पुढील प्रत्येक ५० गुन्हयाकरिता १ PSI, १ ASI/HC व १ PC ची वाढ | | | १ | १ | १ | १ | ४ |
| २६ | १५० विशेष/स्थानिक कायद्यांर्गत गुन्हे (भाग ६) व आकस्मित मृत्यू यांकरीता १ तपास पथक पुढील प्रत्येकी ५० गुन्हयाकरिता १ HC व १ PC ची वाढ पुढील प्रत्येकी १५० गुन्हयाकरिता १ PSI/API ची वाढ | | | १ | १ | १ | १ | ४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | ५०,००० लोकसंख्येमागे १ पोलीस चौकीकरिता<br>पुढील २५००० लोकसंख्येकरीता २ PC | | | | | १ | २ | ३ |
| २८ | १,००० समन्स करीता<br>पुढील प्रत्येक १००० समन्स करीता १ PC | | | | | | १ | १ |
| २९ | २५० वॉरंट करीता<br>पुढील प्रत्येक २५० वॉरंट करीता १ PC | | | | | | १ | १ |
| ३० | २५० अर्ज चौकशी करीता<br>पुढील प्रत्येक २५० अर्ज चौकशीकरीता १ HC | | | | | १ | | १ |
| ३१ | गुन्हे प्रकटीकरण / डी. बी. (दिवस/रात्रौ) | | | २ | | २ | २ | ६ |
| ३२ | प्रत्येक चारचाकी वाहनाकरिता वाहन चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३३ | प्रत्येक दुचाकी वाहनाकरिता चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३४ | प्रत्येक डायल ११२ चारचाकी वाहन - अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| ३५ | प्रत्येक डायल ११२ दुचाकी वाहन - अंमलदार चालकासह (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| ३६ | प्रत्येक १ फिक्स पाईट करिता (दिवस/रात्रौ) | | | | | | १ | १ |
| ३७ | धार्मिक/पर्यटन/वादग्रस्त/मर्मस्थळे (दिवस/रात्रौ) (आवश्यकतेनुसार) | | | | | | १ | १ |
| ३८ | प्रत्येक तालुका पोलीस ठाणे सायबर कक्ष | | | १ | | १ | १ | ३ |
| ३९ | वाहतुक पथक | | | | | १ | १ | २ |
| ४० | रेल्वे स्थानक कर्तव्य (रेल्वे स्थानक आहे परंतु जी.आर.पी. पोलीस ठाणे नाही अश्या ठिकाणी फक्त) | | | | | | १ | १ |
| ४१ | RTPC | | | | | | १ | १ |
| ४२ | CCTV निगराणी | | | | | | १ | १ |
| ४३ | सफाई कर्मचारी (कंत्राटी पदधतीने) | | | | | | | २ |
| | **एकुण** | १ | १ | ६ | ३ | २७ | ५२ | ९२ |
| ४४ | रजा/प्रशिक्षण/आजारपण एकुण मनुष्य बळाच्या १०% राखीव अमंलदार | ० | ० | ० | ० | ३ | ५ | ८ |
| | **एकुण आवश्यक मुनष्यबळ** | **१** | **१** | **६** | **३** | **३०** | **५७** | **१००** |

# परिशिष्ट ७

## नक्षलप्रभावित जिल्ह्यातील पोलीस ठाणेकरिता मनुष्यबळ प्रमाणक

| अ.क्र. | कर्तव्य | PI | API | PSI | ASI | HC | PC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीसठाणे प्रभारी अधिकारी (PI/API/PSI आवश्यकतेनुसार) | | १ | १ | | | | २ |
| २ | ठाणे अंमलदार व मदतनीस (दिवस/रात्रौ) | | | | २ | २ | ४ | ८ |
| ३ | संगणककक्ष/ CCTNS (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| ४ | पोलीसठाणे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ५ | मुद्येमालकारकुन | | | | १ | | १ | २ |
| ६ | लेखनिक / रायटर (प्रत्येकी API -१ HC प्रमाणे), PSI-१ PC | | | | | १ | १ | २ |
| ७ | हजेरीकारकुन /ड्युटी बटवडा | | | | | १ | १ | २ |
| ८ | क्राईम रायटर /गुन्हे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ९ | प्रतिबंधक कारवाई / सर्व्हेलन्स | | | | | १ | १ | २ |
| १० | लॉकअप गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | १ | ३ | ४ | ८ |
| ११ | न्यायालय व पैरवी | | | | | १ | १ | २ |
| १२ | एल. आय. बी. / गोपनिय | | | | | १ | १ | २ |
| १३ | बिनतारी संदेश यंत्रणा (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| १४ | बारनिशी व माहिती अधिकारासाठी | | | | | १ | १ | २ |
| १५ | प्रत्येक ५० गुन्हयांच्या तपासाकरता वेगळे तपास पथक | | १ | २ | २ | २ | ५ | १२ |
| १६ | कोर्टसुरक्षा / निवासस्थान | | | | | | २ | २ |
| १७ | डायल ११२ | | | | | | २ | २ |
| १८ | ॲम्बिस | | | | | २ | | २ |
| १९ | समन्स/वॉरंट | | | | | २ | | २ |
| २० | लॉकअप सुरक्षा/लॉकअप गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| २१ | प्रोपागंडा सेल | | | | | २ | | २ |
| २२ | नक्षल सेल | | | | १ | १ | | २ |
| २३ | टेक सेल | | | | | २ | | २ |
| २४ | एल आर पी/ एस आर पी अभियानासाठी | | | २ | २ | ६ | २१ | ३१ |
| २५ | मोर्चा ड्युटी (६ मोर्चासाठी ) | | | | ४ | | २१ | २५ |
| | **एकुण** | ० | २ | ५ | १३ | ३४ | ७४ | १२८ |